**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. मधुकर चंदर शेवाळे
मु.पो.शिरसी, ता. शिराळा, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट शिक्षणाधिकारी,
शिक्षण विभाग, पंचायत समिती, शिराळा, जि. सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद शाळा शिरसी, ता.शिराळा, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९३९ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १६.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. मधुकर चंदर शेवाळे
मु.पो.शिरसी, ता. शिराळा, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट शिक्षणाधिकारी,
शिक्षण विभाग, पंचायत समिती, शिराळा, जि. सांगली श्री. एस.एन. मंद्रुपकर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद शाळा शिरसी, ता.शिराळा, जि. सांगली
श्री. अशोक बाळकृष्ण पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने त्याच दिवशी सुनावणी घेण्यात आली.

आपल्याला श्रीमती वर्षा विष्णू कांबळे यांच्या रजे संबंधातील माहिती अपुरी देण्यात आली. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची विहित मुदतीत दखल घेतली नाही. याबद्दल, तसेच कर्मचाऱ्यांची तातडीने बदली करणे, रजा मंजूर नसताना पगार घेणे, या नियमबाह्य बाबींबद्दल कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. मधुकर चंदर शेवाळे यांनी केली. श्री. शेवाळे यांना विहित मुदतीत माहिती देण्यात आली. खुलासेवजा अनेक प्रश्न त्यांनी विचारले असून उपलब्ध असलेली सर्व माहिती देण्यात आली व त्याची पोहच त्यांनी दिली आहे. सर्व माहिती मिळाल्याचे प्रथम अपिलाच्या सुनावणीतही त्यांनी स्वाक्षरीसह नमूद केले आहे. अपिलाच्या सुनावणीच्या आदेशाची प्रत देऊ केली असता त्यांनी ती स्वीकारली नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, शिराळा श्री. एस.एन. मंद्रुपकर यांनी केले. हे लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३० .११.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री. बाबुराव ज्ञानेश्वर गायकवाड
मु.पो.वर्धनगड, ता. खटाव, जि.सातारा **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** पोलीस अधीक्षक, सातारा, जि.सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** पोलीस उप अधिक्षक, मुख्यालय सातारा, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६ / २००९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०.११.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. बाबुराव ज्ञानेश्वर गायकवाड<br>मु.पो.वर्धनगड, ता. खटाव, जि.सातारा<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, सातारा, जि.सातारा<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उप अधिक्षक, मुख्यालय सातारा, सातारा | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.५.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र 'अ') प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती आपल्याला दि. १३.११.२००९ रोजी मिळाली असून कोणतीही तक्रार राहिलेली नाही, असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री. बाबुराव ज्ञानेश्वर गायकवाड यांनी राज्य माहिती आयोगाला पाठविले. अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, सातारा यांनीही तसेच निवेदन करुन श्री. गायकवाड यांच्या पत्राची प्रत आयोगाला पाठविली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २७.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.किशोर ठकसेन भिडे
स.नं.४७, प्लॉट नं.९०२, वॉर्ड नं.३, सुनितानगर,
वडगावशेरी, पुणे-१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
बांधकाम विभाग(उत्तर), जिल्हा परिषद, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शाखा अभियंता,
बांधकाम विभाग(उत्तर), जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९७० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
बांधकाम विभाग(उत्तर), जिल्हा परिषद, पुणे श्री.अ.बा.गुडसूरकर

**जन माहिती अधिकारी** तथा शाखा अभियंता,
बांधकाम विभाग(उत्तर), जिल्हा परिषद, पुणे श्री.अ.म.जैन

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे दि.१९.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता हे सुनावणीलाही गैरहजर होते.

जन माहिती अधिकारी तथा यांनी कळविलेले शुल्क भरण्यास आपण गेलो असता, चलनाच्या पावत्या दिल्या नाहीत. आपण पाठविलेली शुल्काची मनीऑर्डर स्वीकारली नाही, अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता(उत्तर), जिल्हा परिषद, पुणे यांच्या निदर्शनास ही बाब आणूनही त्यांनी दखल घेतली नाही, त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करून माहिती निःशुल्क मिळावी, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.किशोर ठकसेन भिडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात केले आहे. श्री.भिडे यांनी याच माहितीच्या संदर्भात तीन अर्ज केले आहेत. प्रत्येक अर्जावर विहित मुदतीत त्यांना शुल्काबाबत कळविण्यात आले. त्याबाबत स्मरणपत्रेही पाठविण्यात आली. चलने उपलब्ध करून घेऊन ते रक्कम भरू शकले असते, तसे त्यांनी केलेले नाही. वेळोवेळी कळविलेले शुल्क (रू.२४५०) त्यांनी भरल्यास त्वरित माहिती देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी दि.२७.६.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त व आयोगापुढील सुनावणीत पूरक कागदपत्रांसह लेखी व तोंडी नमूद केले. हे लक्षात घेता अपीलकर्त्याने माहिती आवश्यक असल्यास शुल्क भरून प्राप्त करून घ्यावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.३०.११.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. रमेश रा. फोंडगे
५४ ब, हनुमान नगर,
पुणे- ४११०१६

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप-आयुक्त (जिं. ध.),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे- ५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सेवक वर्ग अधिकारी,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे- ५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९७५ / २००९ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.५.२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.६.२००९ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ८८ (ब), (क) व (ह) च्या अनुषंगाने माहिती तसेच महानगरपालिकेच्या सेवेत प्रतिनियुक्तीवर असलेल्या शासकिय अधिकाऱ्यांची माहिती मिळणेबाबत. | |

## विवेचन

दिनांक २८.८.२००९ रोजी माहिती प्राप्त झाली असल्याने अपील निकाली काढावे, अशी विनंती दिनांक २.९.२००९ रोजीच्या पत्रान्वये राज्य माहिती आयोगास केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**स्थळ :- पुणे**
**दि.२५-११-२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री चंद्रशेखर पुरुषोत्तम शेठ ..... **अपीलकर्ता**
व्दारा २५, न्यु टिंबर एरिया,
सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** ..... **उत्तरवादी**
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सांगली

**जन माहिती अधिकारी तथा**
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९९८/२००९ सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक २९/१२/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक ५/२/२००९ |
| ४ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक २४/२/२००९ |
| ५ | **माहिती :-** मूळ माहिती अर्ज (जोडपत्र -अ) ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ५/५/२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मधे या अपीलाचा समावेश होता.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र. ५६६६/२००७ मध्ये नागरी सहकारी बँका व पतसंस्था यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही असा दिलेला निर्णय पाहता सदरचे अपील दखल घेण्यायोग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २५-११-२००९.